महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३५९ वा | दिनांक : १३/१२/२०२५ | वार : शनिवार

## मनोज जरांगे पाटलांना थेट राजकीय पक्षाच्या अध्यक्षपदाची ऑफर



**पुणे** : मराठा आरक्षणासाठी उभारलेल्या लढ्यामुळे राज्यात 'किंगमेकर' ठरलेले मनोज जरांगे पाटील यांना आता थेट एका राजकीय पक्षाच्या अध्यक्षपदाची ऑफर देण्यात आली आहे. स्वराज्य शक्ती सेनेच्या अध्यक्षा करुणा मुंडे यांनी जरांगे पाटील यांना आपल्या पक्षाचे अध्यक्षपद स्वीकारण्याचे खुले निमंत्रण दिले आहे. एका बाजूला जरांगे यांना ऑफर देतानाच, दुसरीकडे करुणा मुंडे यांनी भाजपवर सडकून टीका करत पार्थ पवार प्रकरण आणि महायुतीतील राजकारणावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी केलेल्या संघर्षामुळे हैदराबाद गॅझेट लागू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या पार्श्वभूमीवर करुणा मुंडे म्हणाल्या, "मी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या वेळीच जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करून त्यांना निवेदन दिले होते. मनोज जरांगे यांच्यासारख्या लढवय्या नेतृत्वाची आज महाराष्ट्रातील १८ पगड जातींना आणि सर्व समाजघटकांना गरज आहे. त्यामुळे त्यांनी स्वराज्य शक्ती सेनेचे अध्यक्षपद स्वीकारावे, अशी माझी त्यांना विनंती आहे आणि मी ते पद त्यांना द्यायला तयार आहे."

यावेळी बोलताना करुणा मुंडे यांनी परळीच्या राजकारणावरही भाष्य केले. "धनंजय मुंडे किंवा पंकजा मुंडे काय करत आहेत, हे जनता पाहत आहे. मात्र, लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी सायकलवरून फिरून ज्याप्रमाणे संघर्ष केला, तोच वारसा घेऊन मी एकटी महिला असूनही महाराष्ट्र पिंजून काढत आहे. त्यामुळे मुंडे साहेबांचा खरा राजकीय वारसा माझ्याकडेच आहे," असा दावा त्यांनी केला. तसेच वाल्मीक कराड प्रकरणामुळे आमच्या घराण्याची आणि कुळाची बदनामी झाल्याचेही त्यांनी म्हटले.

## हिवाळी अधिवेशनाचे सत्ताधाऱ्यांना गांभीर्य नाही- काँग्रेसची टीका



**मुंबई** : नागपूरचे हिवाळी अधिवेशन अवघे एक आठवड्याचे घेऊन भाजपा महायुती सरकारने विदर्भ कराराचा अनादरच केला आहे. शेतकरी, कामगार, बेरोजगार, कायदा सुव्यवस्था, भ्रष्टाचार महिला सुरक्षा यासारखे असंख्य प्रश्न असताना अधिवेशनात त्यावर चर्चा होत नाही आणि कुठे कुत्री पकडा, बिबटे सोडा यावर चर्चा होत आहे. सत्ताधारी पक्षाला अधिवेशनाचे काही गांभिर्यच राहिलेले नाही, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

नागपूर विधान भवनात प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, भाजपा महायुती सरकारच्या काळात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. दररोज भ्रष्टाचाराची एक एक प्रकरणे उघड होत आहेत. पैशांचा सुळसुळाट सुरु आहे. भ्रष्टाचार हेच सरकारचे ब्रिद वाक्य आहे. 'न खाऊंगा, न खाने दूंगा', पासून झालेली सुरुवात आता 'मिल बाट के खायेंगे' पर्यंत आली आहे.

राज्यातील भ्रष्टाचारावर श्वेतपत्रिका काढून त्यावर चर्चा झाली पाहिजे पण सत्ताधारी पक्षच सभागृहाचे कामकाज सुरुळीत चालू देत नाहीत. गंभीर विषय सुरु असताना सत्ताधारी पक्षाचे सदस्य विनोद करत असतात. लोकशाहीचा कटेलोट होताना दिसत आहे. सत्ताधारी पक्षातीलच काही सदस्य भ्रष्टाचाराचे आरोप करत आहेत, सरकारने आतातरी डोळे उघडावे, असे सपकाळ म्हणाले.

विरोधी पक्ष नेते पदाबद्दल बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, विरोधी पक्षनेतेपदासाठी 10 टक्के सदस्यसंख्येचा दाखला दिला जात आहे, असे असेल तर वरच्या सभागृहात 10 टक्के सदस्यसंख्या आहे व सरकारला प्रस्तावही दिलेला आहे. मग तेथे विरोधी पक्षनेत्याचा निर्णय का घेतला जात नाही? लोकशाही व्यवस्थेत काही प्रथा, परंपरा व संकेत पाळले जातात, दोन्ही सभागृहाचे प्रस्ताव आहेत पण सरकारला संविधानानुसार कामकाज करायचे नाही, हम करोसे कायदा पद्धतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कामकाज रेटत आहेत. फडणविसांनी लोकशाहीची बूज राखली पाहिजे. ते एवढा आव आणत असतात पण हा आव आणत असताना त्यांनी संकेत, नियम पाळले पाहिजेत. विरोधी पक्षनेतेपद देणे हा राजधर्म आहे पण फडणवीस त्यापासून पळ काढत आहेत, असेही सपकाळ म्हणाले.

## मंत्री सभागृहात येत नसतील तर त्यांच्यावर बिबटे सोडा:सुधीर मुनगंटीवार



**नागपूर** : विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात आज भाजपचे ज्येष्ठ नेते आणि आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी रौद्ररूप धारण केलेले पाहायला मिळाले. मंत्र्यांच्या गैरहजेरीवरून आणि घरकुल योजनेच्या रखडलेल्या निधीवरून मुनगंटीवार यांनी सभागृहात आक्रमक होत स्वतःच्याच सरकारला धारेवर धरले. "सभागृहात मंत्री येत नसतील, तर त्यांच्यावर बिबटे सोडा, हे धंदे आता बंद करा," अशा शब्दांत मुनगंटीवार यांनी आपला संताप व्यक्त केला.

विधिमंडळ सभागृहात अर्धा तास चर्चा सत्रात मुनगंटीवार बोलण्यासाठी उभे राहिले असता, संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. यावरून त्यांचा पारा चढला. त्यांनी तालिका अध्यक्षांना सुनावले, "मंत्री महोदयांना सभागृहात आणण्याची जबाबदारी आमची नाही, ती तुमची आहे. आमदार उपस्थित असताना मंत्री गैरहजर राहतात हे चालणार नाही. मंत्री येत नसतील तर त्यांच्यावर बिबटे सोडा, हे धंदे आता बंद करा," अशी उद्विग्न प्रतिक्रिया त्यांनी दिली.

चंद्रपूर जिल्ह्यातील 'यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजने'च्या रखडलेल्या निधीवरून मुनगंटीवार अधिकच आक्रमक झाले. "भारत माता माझी आई, पण डोकं ठेवायला जागा नाही," अशी गरिबांची अवस्था झाली आहे. मुंबईत असलेल्यांसाठी सरकारकडे ११ लाख कोटी आहेत, पण आमच्या चंद्रपूरमधील तुटक्या-फुटक्या घरात राहणाऱ्या गरिबांसाठी लागणारे ९६ कोटी ३६ लाख रुपये मिळत नाहीत. ज्या अधिकाऱ्यांमुळे ही परिस्थिती ओढवली आहे, त्यांनी कोरड्या विहिरीत जीव दिला पाहिजे, अशा तिखट शब्दांत त्यांनी प्रशासनाचे वाभाडे काढले.

सरकारच्या कारभारावर टीका करताना मुनगंटीवार यांनी अस्सल म्हणींचा वापर केला. ते म्हणाले, "या योजनेचा एक हप्ता मिळाल्यावर दुसऱ्या हप्त्यासाठी गरिबांना चातक पक्ष्यापेक्षा जास्त वाट पाहावी लागते. मंत्री महोदय, कापूसकोंड्याची गोष्ट संपेल, बिरबलाची खिचडी शिजेल, चिऊताई दरवाजा उघडेल, पण तुमचा निधी काही येत नाही." अधिकाऱ्यांनी लिहून दिलेली उत्तरे वाचू नका, तर निधी कधी देणार ते स्पष्ट सांगा, असा थेट जाब त्यांनी मंत्री अतुल सावे यांना विचारला.

दरम्यान, सुधीर मुनगंटीवार यांनी परखड शब्दांमध्ये घरकुल योजनेबाबतची आपली तक्रार मांडल्यानंतर ओबीसी मंत्री अतुल सावे यांनी निधी लवकरात लवकर दिला जाईल असं आश्वासन दिलं. "पुरवणी मागण्यांमध्ये या योजनेसाठी ३०० कोटी मंजूर झाले आहेत. चंद्रपूरला विहीत १०० टक्के निधी तातडीने दिला जाईल. आपण नवीन घरकुलं पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून देत आहोत. पण आधीच्या घरकुल योजनेसाठी आपण ३०० कोटींची व्यवस्था केली आहे. ताबडतोब त्यावर कार्यवाही होईल", असं ते म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १३ डिसेंबर २०२५

## लोकनेते स्व. गोपीनाथजी मुंढे साहेब यांच्या जयंतीनिमित्त श्री समर्थ क्लिनिक मध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन






**बुलढाणा (महेश मुंढे) :** दिनांक १२ डिसेंबर २०२५- लोकनेते स्व. गोपीनाथजी मुंढे साहेब यांच्या जयंतीनिमित्त तसेच श्री साई मेडिकल एजन्सी च्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त किनगाव राजा येथील श्री समर्थ क्लिनिक मध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. समाजोपयोगी उपक्रमाच्या माध्यमातून स्व. गोपीनाथजी मुंढे साहेबांच्या कार्याचा ध्यास जपण्याचा उद्देश या शिबिरामागे होता. शिबिराचे उद्घाटन आदरणीय श्री खुशालराव नागरे सर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लोकनेते स्व. गोपीनाथजी मुंढे साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले, कार्यक्रम स्थळी उत्साह पूर्ण वातावरणात नागरिकांनी रक्तदानासाठी पुढाकार घेतल्याचे चित्र दिसून आले. या उपक्रमाचे आयोजन डॉक्टर श्री शिवानंद जायभाये व श्री समर्थ मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते उद्घाटन प्रसंगी बोलताना श्री खुशालराव नागरे सर यांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित केले त्यांनी लोकनेते स्व. गोपीनाथजी मुंढे साहेब यांनी आयुष्यभर समाज हितासाठी घेतलेल्या परिश्रमांची आठवण करून दिली, तसेच डॉक्टर श्री शिवानंद जायभाये यांनी आरोग्य सेवेच्या दृष्टीने रक्तदानाचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगत नागरिकांना अशा उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी श्री भरत जायभाये यांनी उपस्थित पाहुण्यांचे व रक्तदात्यांचे तसेच शिबिराच्या आयोजनात सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले, किनगाव राजा परिसरातील नागरिकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाल्याने शिबिर अत्यंत यशस्वी ठरले.

## कौशल्य विकासाचे प्रभावी माध्यम ए.आय. तंत्रज्ञान - योगेश उबाळे



**छत्रपती संभाजीनगर :** मानवी जीवनात शिक्षणाला जेवढे महत्व आहे तेवढेच आज आधुनिक तंत्रज्ञानाला , आपले यश हे स्मार्ट झाल्याशिवाय शक्य नाही , मानवी बुद्धीसोबत कृत्रिम बुद्धीची स्पर्धा सुरू झाली आहे, आज कौशल्य विकासाचे प्रभावी माध्यम ऐआय तंत्रज्ञान हे जीवन विकासाचा अनिवार्य भाग झाला आहे" असे प्रतिपादन एमकेसिएलचे तंत्रस्नेही योगेश उबाळे यांनी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात सायबर सिक्युरिटी आणि ऐआय अवरनेस सेमिनार मध्ये बोलतांना योगेश उबाळे यांनी सायबर साक्षरता तसेच समाज माध्यमांचा वापर, त्यावरून होणारी फसवणूक, महिला मुलींना होणारे त्रास याबाबत जागरुक राहण्याचे आवाहन केले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भय्यासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच आजीवन शिक्षण विस्तार विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा नवनाथ गोरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी ऑर्बिट कम्प्युटरचे समन्वयक वसंत सातदिवे व शुक्ला कम्प्युटरचे सचिन अस्वले यांनी सायबर गुन्हे व शैक्षणिक, कार्यालयीन कामातील कृत्रिम बुद्धिमता यावर सप्रयोग मार्गदर्शन केले. याच कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी ऐआय अवरनेस ऑनलाईन चाचणी देत एमकेसीएलचे प्रमाणपत्र मिळवले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. आर. व्ही. मस्के यांनी समाजमाध्यमांचा वापर करतांना होत असलेल्या फसवणूकीचे प्रकार तसेच डिजिटल अरेस्ट याविषयी माहिती देत तंत्रज्ञानातील सुरक्षितता स्पष्ट केली. यावेळी उपप्राचार्य प्रा.एन. एम. करडे , डॉ.बी.एन. शिंदे , डॉ. एस. पी. खिल्लारे , डॉ. प्रज्ञा रूईकर साळवे, डॉ.एस.पी. बुधवंत , अधिक्षक राजू पट्टेकर , डॉ. गौतम घाडगे यांच्यासह विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिपाली गायकवाड यांनी तर आभार डॉ. पूजा वडमारे यांनी केले.

## श्री संत ज्ञानेश्वर विद्या मंदिरात ‘सखी एक-थांबा केंद्र’ विषयावर मार्गदर्शन




**शिवनगर, कन्नड :** श्री संत ज्ञानेश्वर विद्या मंदिर, शिवनगर कन्नड येथे आज महिला संरक्षण अधिकारी श्री. सतीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ‘सखी एक-थांबा केंद्र’ या महत्वाच्या उपक्रमाबाबत जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.या प्रसंगी सखी एक-थांबा केंद्राच्या समुपदेशक सौ. पल्लवी पाटील यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य देणाऱ्या सरकारी सेवांची सविस्तर माहिती दिली. अत्याचार, छळ, भेदभाव किंवा संकटाच्या प्रसंगी महिलांना मिळणारी तातडीची मदत, कायदेशीर सल्ला, वैद्यकीय सुविधा, सुरक्षित निवारा , महिला हेल्पलाइनची उपयुक्तता याबद्दल त्यांनी मुलींना समजावून सांगितले.तसेच कार्यक्रमाला उपस्थितीतांना सखी वन स्टॉप सेंटर, महिला सक्षमीकरण केंद्र ,महिला हेल्पलाइन १८१ , हुंडा प्रतिबंध कायदा, कौटुंबिक हिंसाचार अधिनियम २००५ कायदा , चाईल्ड हेल्प लाईन १०९८ याबाबत माहिती देण्यात आली. तसेच माहितीपत्रके वाटप करण्यात आली.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनींनी शंका विचारून संवाद साधला आणि अशा प्रकारच्या केंद्रांची माहिती प्रत्येक मुलगी व महिलेला असणे किती आवश्यक आहे, यावर भर देण्यात आला.या वेळी महिला बालविकास कार्यलयातील समुपदेशक जयश्री गिरासे ,कर्मचारी भीमदेव चव्हाण ,गणेश राजपूत शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढतो व सुरक्षिततेची जाणीव मजबूत होते असे सांगून पल्लवी पाटील यांचे मनापासून आभार मानले.

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १३ डिसेंबर २०२५


## वरठाणचे माजी सरपंच नंदूसिंग सोळंके यांचे निधन



**वरठाण :** वरठाण ता.सोयगाव जि.संभाजीनगर येथील माजी सरपंच, सामाजिक नेते नंदूसिंग गोविंदसिंग सोळंके ( ६६ ) यांचे काल रात्री ८.३० वाजता निधन झाले. त्यांच्या अंतयात्रेला वरठाण येथे विविध गावातील नागरिक, अधिकारी मोठ्या संखेने उपस्थित होते.माजी आमदार उदयसिंग राजपूत, डॉ. बलराज पांडवे. राजू राठोड, प्रा. डी.डी. पाटील, के.बी जाधव यांनी श्रध्दांजली वाहिली. त्यांच्यामागे आई, पत्नी, मुलं, मुली, नातवंडांचा परिवार आहे.

## बौद्धमय भारतासाठी भैय्यासाहेब आयुष्यभर झटले ; अभिवादन प्रसंगी अनेकांनी व्यक्त केल्या भावना



**छत्रपती संभाजीनगर :** दि.१२ बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्धमय भारत करण्याचा संकल्प केला हा संकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी भैय्यासाहेब आंबेडकर आयुष्यभर झटले देशभरात बौद्ध धम्माचा झालेला प्रचार प्रसार करण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले असे गौरवोद्गार सुर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या जयंती प्रसंगी अभिवादन कार्यक्रमात अनेकांनी व्यक्त केले. रिपब्लिकन सेनेच्या वतीने सुर्यपुत्र यशवंत तथा भैय्यासाहेब आंबेडकर यांना ११३ व्या जयंतीनिमित्त सुर्यपुत्र यशवंत भैय्यासाहेब आंबेडकर चौक, नागसेनवन येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी भैय्यासाहेब आंबेडकरांनी रिपब्लिकन ऐक्यासाठी केलेले प्रयत्न, बौद्धांना अनुसूचित जातीच्या सवलती मिळाव्यात यासाठी केलेले अनेक आंदोलने, आयुष्यभर केलेला संघर्ष यावर अनेकांनी आपल्या वक्तव्यातून प्रकाश टाकला.यावेळी प्राचार्य सुनील वाकेकर, डॉ.सुशील सुर्यवंशी, सचिन निकम, काकासाहेब गायकवाड, माजी नगरसेवक पंकज भरसाखळे, भाक्रांद चे शैलेंद्र मिसाळ, सुरेश चव्हाण आदींनी मनोगत व्यक्त केले.सदरील चौकाचे नामकरण व पूर्णाकृती पुतळ्याचा महानगरपालिकेत ठराव मंजूर करवून घेणारे ठरावाचे सूचक माजी नगरसेवक पंकज भारसाखळे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.यावेळी रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ.सुशील सुर्यवंशी, नेते प्राचार्य सुनील वाकेकर, महाराष्ट्र सदस्य चंद्रकांत रुपेकर, पूर्व जिल्हाध्यक्ष मिलिंद मोकळे, पश्चिम जिल्हाध्यक्ष काकासाहेब गायकवाड, रिपब्लिकन विद्यार्थी सेनेचे सचिन निकम, मध्य शहराध्यक्ष राहुल गवळी, गौतम गणराज,महेश तांबे, युवा जिल्हाध्यक्ष राहुल कानडे, कामगार सेनेचे धम्मपाल भुजबळ, विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष कुणाल भालेराव, विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष बालाजी सोनवणे, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा मनीषा साळुंखे, शहर प्रमुख डॉ.संगीता अंभोरे, प्रा.शितल बनकर, वाघमारे ताई, राजू भाऊ मगरे , अनिल खरात, संदिप अहिरे, शेख शकील, मिम सेनेचे अस्कर खान, असजद खान, अनिल तुपे, विनोद वाकोडे, राजू भालेराव, प्रवीण शिंदे, मधुकर मघाडे, किरण मगरे, ऋषिकेश निकम, राजू हिवराळे आदींसह मोठ्या संख्येने रिपब्लिकन सेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## फुलंब्री येथे गोमांस वाहतूक करणारी रिक्षा पकडून कारवाई



**कन्नड(अरुण थोरात):** पोलीस ठाणे फुलंब्री हद्दीत दि.१२ डिसेंबर रोजी पोलीस ठाणे फुलंब्री येथील सपोनि. श्री मुऱ्हाडे, पोहेकॉ. श्री राठोड हे अवैध धंदे ची माहिती काढून कारवाई करणे साठी पेट्रोलिंग करीत असताना नायगाव कडून एक रिक्षा येत असून त्या मध्ये गोव◌ंश मांस आहे. अशी माहिती मिळाल्यावर त्यांनी उपविभागीय अधिकारी ग्रामीण पुजा नागरे यांना कळवून तसेच वरिष्ठांना कळविल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा नागरे व पोनि. श्री सहाने फुलंब्री यांनी ०८.४० वा. सदर ठिकाणी सावंगी सारा परिवर्तन समोर रोडवर जाऊन सर्व स्टाफ सह सदरची रिक्षा थांबून तपासणी केली असता सदर रिक्षा क्रमांक MH२० Ek ४११५ मध्ये लाल रंगाचे गोवंश मांस दिसून आले, सदर रिक्षा चालकास त्याबाबत नाव विचारले असता त्याने अबूजर सत्तार कुरेशी (वय २६ वर्षे) रा .नायगाव ता.जि छत्रपती संभाजीनगर असे सांगितले सदरचे गोवंश मांस नायगाव येथून छत्रपती संभाजीनगर येथे घेऊन जात असल्याचे सांगितले, दोन पंचा समक्ष जप्ती पंचनामा करून सदर रिक्षा वजन काट्यावर नेऊन वजन केले असता. सदर गोमा से वजन ०६ क्विंटल ५७ किलो भरले. सदर मांसची किंमत प्रति किलो २००रु प्रमाणे १३१४०० रु. व रिक्षांची किमत एक लाख रु. असे एकूण २३१४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पशुवैद्यकीय अधिकाऱ्याकडून मांसचे सॅम्पल नमुने काढून उर्वरित मांस मोकळ्या जागेत खड्डा करून दोन पंचासमक्ष नाष्ट केले, असून पोलीस ठाणे फुलंब्री येथील पोहेकॉ. कैलास राठोड यांचे तक्रारीवरून प्राणी संरक्षण अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदरची कारवाई छत्रपती संभाजीनगर ग्रामीण चे पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांचे मार्गदर्शन खाली करण्यात आली.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903



जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १३ डिसेंबर २०२५


## ‘मराठा विरुद्ध ओबीसी : प्रस्थापितांचे राजकारण’ ग्रंथास दीनमित्रकार मुकुंदराव पाटील राज्यस्तरीय वैचारिक साहित्य पुरस्कार




**छत्रपती संभाजीनगर :** सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समिती, तरवडी यांच्या वतीने दिला जाणारा २०२५ सालचा दीनमित्रकार मुकुंदराव पाटील राज्यस्तरीय वैचारिक साहित्य पुरस्कार यंदा ‘मराठा विरुद्ध ओबीसी : प्रस्थापितांचे राजकारण’ या ग्रंथाला जाहीर झाला आहे. समितीचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, उपाध्यक्ष बाबा आरगडे आणि सचिव उत्तमराव पाटील यांनी ही घोषणा केली.लोकगाथा प्रकाशनतर्फे प्रकाशित झालेल्या या ग्रंथाचे संपादन डॉ. प्रभाकर गायकवाड आणि प्रा. सुदाम चिंचाणे यांनी केले असून, सध्या राज्यात उभ्या राहिलेल्या मराठा—ओबीसी आरक्षण संघर्षाचे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक पैलू यात मांडले आहेत.महाराष्ट्रात आरक्षणाच्या प्रश्नावरून गेल्या काही वर्षांत मराठा आणि ओबीसी समाजामध्ये वाढलेली तणावपूर्ण परिस्थिती, आंदोलनांची मालिका, दोन्ही समाजांची परस्परविरोधी मागणी आणि त्यामागील विविध हितसंबंधांचे टकराव, त्याला जातीचे, वर्गाचे असलेले पदर अभिनिवेशरहित पद्धतीने समजून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न यांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण ग्रंथात केले आहे. आरक्षणाची धोरणे, वास्तव आणि अपेक्षा, सामाजिक न्यायाची भूमिका, वर्ग—जाती संघर्षाचे बदलते आयाम, मराठा आरक्षणाच्या मागणीला असलेले विविध संदर्भ, मराठा आरक्षण पेचप्रसंग, ओबीसी - मराठा आरक्षण आणि जातीउच्चभ्रूंचे वर्गीय संबंधाचे राजकारण, जातिनिहाय जनगणना, बेरोजगारीचे प्रश्न आणि आरक्षणासंदर्भातील राजकीय हस्तक्षेप अशा विविध मुद्द्यांवर राज्यातील अनुभवी तसेच तरुण अभ्यासकांच्या लेखांचा समावेश आहे. खऱ्या अर्थाने प्रतिनिधीत्वाचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे हे विसरून धरणार नाही. जाती व्यवस्थेने उपेक्षित ठेवलेल्या जातिंना न्याय देण्यासाठी आरक्षणाच्या सामाजिक न्यायाच्या तत्वातून प्रयत्न केला आहे. सम्यक व अभ्यासपूर्ण मांडणी सदर ग्रंथात केलेली आढळते.प्रकाशनानंतर अवघ्या तीन महिन्यांत या ग्रंथाची पहिली आवृत्ती संपली असून दुसऱ्या आवृत्तीला वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नव्या आवृत्तीला माफुआचे अभ्यासक डॉ. सचिन गरुड यांची प्रस्तावना लाभली आहे. तसेच ज्येष्ठ इतिहासकार डॉ. उमेश बगाडे आणि जातीय राजकीय अर्थशास्त्राचे अभ्यासक डॉ. राजू जाधव यांनी ग्रंथाला पाठराखण आहे.हा ग्रंथ सध्याच्या गुंतागुंतीच्या सामाजिक—राजकीय प्रक्रियांचा वेध घेण्यासाठी हा ग्रंथ विधायक हस्तक्षेप ठरतो. राज्यकर्ते, अभ्यासक, कार्यकर्ते आणि विद्यार्थी यांच्यासाठी तो उपयुक्त संदर्भग्रंथ आहे.पुरस्कार वितरण सोहळ्याची तारीख समितीकडून लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.






## गुन्हे तपासातील गती तसेच नागरिकांची सुरक्षा सर्वाधिक प्राधान्याची - पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र



**कन्नड (अरुण थोरात):** वीरेंद्र मिश्र, विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र यांनी दि. ११ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयात जिल्हा गुन्हे आढावा बैठक घेतली. या बैठकीत जिल्ह्यातील गुन्हेगारी स्थिती, प्रलंबित तपास, तांत्रिक साधनांचा वापर, सायबर सुरक्षितता, नागरिकाभिमुख पोलीसिंग, तसेच २४ पोलीस ठाण्यांच्या कामकाजाचा व्यापक आढावा घेण्यात आला. विशेष महानिरीक्षकांनी प्रलंबित गुन्ह्यांची संख्या कमी करण्याचे आणि चोरी संबंधित गुन्ह्यांचा तपास एका जबाबदार अधिकाऱ्याकडे सोपविण्याचे स्पष्ट निर्देश दिले. चोरी गेलेला मुद्देमाल तात्काळ हस्तगत करून फिर्यादींना परत देणे, तपासातील गुणवत्ता वाढवणे आणि जलद निपटारा करणे यावर त्यांनी विशेष भर दिला. “नागरिकांचा विश्वास हा तपासातील वेग आणि पारदर्शकतेवर अवलंबून आहे” असे त्यांनी नमूद केले. स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका पार पडल्या — मतमोजणी व स्ट्रॉंग गार्डसाठी कडक सुरक्षा बंदोबस्ताचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज संस्था निवडणुकांनंतर आता जिल्ह्यातील सर्व मतमोजणी केंद्रांवर शांतता आणि कायदा-सुव्यवस्था राखणे अत्यंत महत्वाचे असल्याचे श्री मिश्र यांनी बैठकीत नमूद केले. मतमोजणी प्रक्रिया ही निवडणुकांच्या दृष्टीने सर्वाधिक संवेदनशील टप्पा असून, कोणताही अनावश्यक तणाव, गैरप्रकार किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये यावर त्यांनी भर दिला.यासाठी स्ट्रॉंग रूम, मतपेट्यांच्या वाहतूक मार्ग, आणि मतमोजणी केंद्रांवर बहुपेडी सुरक्षा यंत्रणा उभारण्याचे आदेश देण्यात आले. केंद्रांच्या आतील व बाहेरील परिसरात पोलिसांचा शिस्तबद्ध बंदोबस्त, प्रवेशद्वारांवर कठोर तपासणी, सिसिटीव्ही आणि व्हिडिओ मॉनिटरिंग प्रणालींचा वापर, आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष देखरेख अनिवार्य राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. सायबर अवेअरनेस- नागरिकांमध्ये डिजिटल सुरक्षिततेची जाणीव सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असल्याची नोंद घेऊन जनजागृती मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले. ऑनलाईन फसवणूक, मालवेअर, सोशल इंजिनिअरिंग यासारख्या गुन्ह्यांबाबत नागरिकांना सतत शिक्षित करण्यासाठी शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक ठिकाणे आणि माध्यमांचा वापर करण्याचे आदेश देण्यात आले.बैठकीदरम्यान ‘आपले सरकार’ ई-ऑफिस, पोलीस अधीक्षक कार्यालयाची वेबसाईट, तसेच नव्याने विकसित वेब-ॲप्लिकेशन याबाबत कामकाजातील पारदर्शकता, तात्काळ सेवा वितरण आणि डेटा व्यवस्थापन सक्षम करण्यासाठी विशेष मार्गदर्शन केले.२४ पोलीस ठाण्यांचा सविस्तर जिल्ह्यातील सर्व २४ पोलीस ठाणे सह, स्थानिक गुन्हे शाखा, विशेष शाखा ,आणि वाहतूक शाखेचा समावेशक आढावा घेण्यात आला. यामध्ये पुढील बाबींवर विशेष भर देण्यात आला.१. अवैध व्यवसायांवरील कडक कारवाई (दारूबंदी, जुगार, एन.डी.पी.एस., आर्म्स ॲक्ट, वाळू चोरी, पिटा)२. प्रलंबित गुन्ह्यांचे प्रमाण घटवणे३. फरार आरोपींना अटक व कन्व्हिक्शन दर वाढविणे४. समन्स व वॉरंट बजावणीतील प्रगती५. मालमत्ता विषयक गुन्हे व मुद्देमाल निर्गती६. मोटार वाहन कायद्याच्या अंमलबजावणीत काटेकोरपणा७. वरिष्ठ प्रलंबित अर्ज तात्काळ निकाली काढणेमा. विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी स्पष्टपणे सांगितले की, “प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढा, तपासात गती आणा आणि नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करा.” असे आदेशित केले.जिल्ह्यातील शांतता व कायदा-सुव्यवस्थेसाठी ई-बिट प्रणाली प्रभावीपणे राबविणे, बीटबुक अद्ययावत ठेवणे, संशयितांवर देखरेख, तसेच रात्रीच्या वेळी कडक नाईट पेट्रोलिंग ठेवण्याचे निर्देश दिले.तपास अधिक वैज्ञानिक, वेगवान आणि अचूक करण्यासाठी मा. विशेष पोलीस महानिरीक्षकांनी १३ राष्ट्रीय पोर्टल्स प्रणालीचा तपासात उपयोग करणे बाबत स्पष्ट केले. उल्लेखनीय कामगिरीबद्दल २० अधिकारी आणि ४३ अंमलदारांना मा. विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या हस्ते प्रशंसापत्र देऊन सन्मानित करण्यात आले.या बैठकीस पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी, शाखा प्रमुख व सर्व २४ पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १३ डिसेंबर २०२५


## शाळा बंद आंदोलनाच्या दिवसाचा पगार कपात होणार नाही




**कन्नड (अरुण थोरात) :** महाराष्ट्र राज्यातील संस्था मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षकेतर संघटनांनी विविध मागण्यांसाठी ०५ डिसेंबर २०२५ रोजी शाळा बंद आंदोलन केले होते. यावर शिक्षण संचालक यांनी शिक्षक शिक्षकेतरांचा एक दिवसाचा पगार कपात करण्याचे आदेश काढले होते, त्याकरता आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी हिवाळी अधिवेशन मध्ये विधिमंडळ प्रश्न उपस्थित करून, पगार कपात करू नये, अशी मागणी केली तसेच शाळा बंद असलेल्या दिवसाला आम्ही सुट्टीच्या दिवशी कामकाज भरून काढू व विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ देणार नाही. त्यामुळे पगार कपात करू नये अशी विनंती केली त्यानुसार शालेय शिक्षण विभागाचे राज्यमंत्री पंकज भोयर यांनी पगार कपातीचा आदेश रद्द केला जाईल असे उत्तर दिले. या निर्णयाचे म.रा.प्राथमिक शिक्षक समितीचे आ. ज्ञानेश्वर म्हात्रे आणि शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांचे आभार मानले आहे. असे शिक्षक समितीचे मराठवाडा प्रसिध्दी प्रमुख सतिष कोळी यांनी कळविले आहे. यांप्रसंगी शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष विजय साळकर, रंजित राठोड, नितीन नवले, अशोक डोळस, राजू ठाकूर आदी उपस्थित होते.

## व्हॉलीबॉल स्पर्धेत स. भु. वडोद बाजार येथील स्पर्धक कु. गिरीजा पवार हिची राष्ट्रीय स्तरावर निवड



**वडोद बाजार (कृष्णा शिंदे) :** महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटनेतर्फे ४९ वी राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा मुंबई येथे पार पडली त्यात राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी गिरजा पवार हिची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे. ही व्हॉलीबॉल स्पर्धा पलानी, झुंझुनू, राजस्थान येथे दि.१६.१२.२०२५ ते २१.१२.२०२५ दरम्यान पार पडणार आहे. गिरजाच्या या यशाबद्दल शालेय समन्वय समितीचे अध्यक्ष श्री अमोलजी भाले साहेब व मराठवाडा विभागीय सचिव श्री सतीश पाठक छत्रपती संभाजी नगर व्हॉलीबॉल संघटनेचे कार्याध्यक्ष उन्मेश शिंदे व प्रवीण शिंदे यांनी आनंद व्यक्त करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. शालेय समितीचे अध्यक्ष श्री डॉ. गोपाळराव पा. वाघ तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री एस आर दाभाडे सर यांनीही व्हॉलीबॉल स्पर्धक गिरजा पवार हिल मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक श्री एस बी पचलुरे सर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. प्रशालेतील शिक्षक व शिक्षकेतर सहकारी यांनीही व्हॉलीबॉल स्पर्धक गिरजा पवार हिचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## शिवाजी महाविद्यालयात 'संशोधन पद्धती' विषयावर कार्यशाळा संपन्न



**कन्नड (प्रतिनिधी) :**येथील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा विभाग, अंतर्गत मराठी भाषा संशोधन केंद्र कार्यरत आहे. या केंद्रातर्गत मराठी विषयाचे संशोधक विद्यार्थी विविध विषयावर संशोधन करत आहेत. या संशोधक विद्यार्थ्यांना संशोधनासाठी उपयुक्त संशोधन पद्धती या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. (ता. ११ ) कन्नड सारख्या ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना मराठी विषयात संशोधन (Ph.D. ) करण्याची सुविधा मराठी विभागाच्या संशोधन केंद्रात उपलब्ध झाली आहे. कन्नड तालुक्यात मराठी विषयाचे हे एकमेव संशोधन केंद्र आहे. प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेचे उदघाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे यांच्या हस्ते संपन्न झाले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर होते. व्यासपीठावर डॉ. सविता वावगे, डॉ. प्रतिभा अहिरे, मराठी विभाग व संशोधन केंद्र प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे यांची उपस्थिती होती. डॉ. जिगे त्यांनी संशोधन : संकल्पना , स्वरूप आणि व्याप्ती, या विषयावर संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर डॉ. सविता वावगे यांनी 'शोध प्रबंधाची लेखन पद्धती' या विषयावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. शिवाजी हुसे यांनी केले तर सूत्रसंचलन करून आभार डॉ. रामचंद्र झाडे यांनी मानले. कार्यशाळेस संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

## प्रचारांच्या तोफामुळे गाजली जिंतूर ची निवडणूक

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर राजकीय वर्चस्वातुन प्रतिष्ठेची झालेली जिंतूर नगरपालिकेची निवडणूक प्रचारांच्या तोफामुळे चांगलीच गाजली .या निवडणुकीसाठी यंदा जवळपास 72 टक्के मतदान शांततेत आणि उत्साहात पार पडले. प्रचारातील मुद्द्यावर मतदारांनी किती गांभीर्याने विचार केला हे निघालातून स्पष्ट होईल.यंदाच्या प्रचारात पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते दुरुस्ती तसेच शहरांच्या विकासकामांचे मुद्दे सर्वांनीच मांडले. जिंतूरच्या विकासाची व्हिजन हाच सर्वच उमेदवारांच्या प्रचाराचा केंद्रबिंदू होता. प्रतिष्ठेची निवडणूक आश्वासने आणि आरोप प्रत्यारोपच्या धुरळ्यात ही लढत शिगेला पोचली होती.या निवडणुकीत प्रचारासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस कडून उपमुख्यमंत्री अजित पवार व नवाब मलिक यांचे जाहीर सभा घेऊन ताकद दाखवली तर त्याला प्रत्युत्तर म्हणून भाजपाने पालकमंत्री मेघनादिदि बोर्डीकर साकोरे व माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांची सभा घेऊन शक्तिप्रदर्शन झाले. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी नगरपालिकेतील राष्ट्रवादीच्या उमेदवार व अध्यक्षला निवडून दिल्यास मोठा निधी देण्याची ठोस अस्वासन दिले .तर भाजपांकडून पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर व माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांनी केंद्रातही भाजप राज्यातही भाजप असे दोन्ही कडे भाजपांचीच सरकार असल्यामुळे तुम्हाला कुठलाही निधी कमी न पडता आपल्याला जिंतूर चा विकास साधण्याचे आहे असे आश्वासन दिले.स्थानिक नेत्यांनी दाखवली ताकदया निवडणुकीत राष्ट्रवादी अजित पवार गट व भाजपाला ही निवडणूक आमने-सामने लढवावी लागली यापूर्वी पालिकेत राष्ट्रवादी सत्ता असल्याने राष्ट्रवादी माजी आमदार विजय भांबळे यांनी मुख्य उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सभा घेऊन ताकद दाखवली.तर भाजपाकडून विद्यमान आमदार तसेच पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांनी व माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांनी आपली शक्ती प्रदर्शन दाखवत आमचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार व त्याची कारकीर्द पाहूनच आम्ही उमेदवारी दिल्याचेही स्पष्ट केले व जिंतूर चा विकास हेच लक्ष असल्याचे सभेमध्ये दाखवून दिले.या निवडणुकीत राष्ट्रवादी व भाजपामध्ये खरी लढत चे चित्र दिसून आले. ही निवडणूक गांभीर्याने घेतल्याने पालिकेचे निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले असून ते २१ डिसेंबर रोजी स्पष्ट होईल.बुथ निहाय आकडेमोड सुरू-

मतदान प्रक्रियेनंतर आता उमेदवारांचे लक्ष 'विजयाचे गणित" जुळवण्याकडे वळले आहे. शांततेत मतदान पार पडले असले तरी, मतदानांची टक्केवारी पुढे येताच प्रत्येक उमेदवाराने आपापल्या मत क्षेत्रातील शक्यतांचा अंदाज बाधण्यास सुरुवात केली आहे. प्रमुख पक्ष बुथनिहाय मतदान टक्केवारीचा आढावा घेत आकडेमोड सुरू करत असल्याने कौल कोणाच्या बाजूने झुकतो, यांची उत्सुकता चांगलीच वाढलेली दिसून येते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १३ डिसेंबर २०२५


# शेतकऱ्यांना 'बळीराजा रस्ते' योजनेचा आधार



**नागपूर :** राज्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत जिव्हाळ्याच्या असलेल्या शेत रस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी स्वतंत्र योजना राबविण्यासह, मुंबईतील गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासातील अडथळे दूर करणारे तसेच वर्ग २ च्या जमीनी वर्ग १ करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. असे महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतले आहेत. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात चार निवेदने सादर केली.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतापर्यंत पोहोचण्यासाठी बारमाही आणि मजबूत रस्ते उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महसूल विभागामार्फत 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना' राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

•**यंत्रसामुग्रीचा वापर :** शेतीतील यांत्रिकीकरण लक्षात घेऊन ही योजना पूर्णपणे यंत्रसामुग्रीच्या साहाय्याने राबविली जाईल.

•**अतिक्रमण निर्मूलन :** गाव नकाशावर दर्शविलेल्या रस्त्यांवरील अतिक्रमणे या योजनेअंतर्गत त्वरित हटविली जातील.

•**मोफत मोजणी व शुल्क माफी :** या रस्त्यांसाठी लागणारी तातडीची मोजणी आणि पोलीस बंदोबस्त शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले आहे. तसेच, रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी लागणाऱ्या गाळ, माती, मुरूम किंवा दगडासाठी कोणतेही स्वामित्व शुल्क (रॉयल्टी) आकारले जाणार नाही.खर्चासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार केले जाणार आहे.

•**आमदारांच्या अध्यक्षतेखाली समिती :** योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विधानसभा क्षेत्रस्तरावर आमदारांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

मुंबईतील अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारती मोडकळीस आल्या असून, त्यांना स्वयंपुनर्विकासासाठी प्रोत्साहन देणारा निर्णय घेण्यात आला आहे.

•**अट रद्द :** प्रधानमंत्री आवास योजनेसाठी वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकाच्या (FSI) पैकी २५% चटईक्षेत्र उपलब्ध करून देण्याच्या अटीमुळे सोसायट्यांना योजनेचा लाभ घेता येत नव्हता. आता स्वयंपुनर्विकास करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी ही २५% एफएसआयची अट वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**वर्ग-२ जमिनींचे वर्ग-१ मध्ये रूपांतर करण्यास मुदतवाढ**

भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींचे भोगवटादार वर्ग-१ (फ्री होल्ड) मध्ये सवलतीच्या दराने रूपांतर करण्याच्या योजनेला मुदतवाढ देण्यात आली आहे.

•**नवीन मुदत :** ही सवलत योजना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत होती, ती आता एक वर्षाने वाढवून ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत करण्यात आली आहे.

•**विलंबासाठी सवलत :** न्यायालयीन प्रकरणे किंवा नियोजन प्राधिकरणाने विकास योजनेत केलेला बदल अशा कारणांमुळे जमिनीचा वापर करण्यास ५ वर्षांपेक्षा जास्त विलंब झाला असल्यास, शासनाची खात्री पटल्यावर वापराबाबतची ५ वर्षांची अट शिथील करण्यात येईल.

•खासगी संस्थांना रेडीरेकनरच्या १० टक्के तर स्वयं पूर्नविकासासाठी ५ टक्के निधी भरावा लागणार आहे.

**दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्यांचे दर सुधारित**

मुंबई शहर व उपनगरातील शासकीय जमिनींवर ९०, ९९ किंवा ९९९ वर्षांच्या दीर्घ मुदतीचे भाडेपट्टे आहेत, त्यांच्या दरात सुधारणा करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

ज्या जमिनींच्या करारात विशिष्ट कालावधीनंतर दर सुधारण्याची तरतूद आहे, तिथे शासनाच्या २५ टक्के मूल्यांकनावर सुधारित भाडेपट्ट्याची रक्कम निश्चित करून वसूल करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तसेच, मूळ भाडेपट्टाधारकाकडून जमिनीचा ताबा सहकारी संस्थेकडे हस्तांतरित झाला असल्यास, अनर्जित उत्पन्न वसूल करून संस्थेच्या नावे भाडेपट्टा नूतनीकरण केले जाईल.

## आकाशाचा फळा

निसर्गाने तयार केला
आकाशाचा फळा
रात्रीला भरते
चांदण्यांची शाळा

दूर दूर धावतो
चंद्रातला ससा
चांदण्यांशी खेळण्यासाठी
झाला वेडा पिसा

सात रंगांची उधळण
करी दिवसा इंद्रधणू
निळ्या आकाशातला
रंगारी जणू

काळे काळे ढंग
होतात जमा
आपसात भांडती
नसे कुणाची तमा

सूर्य सकाळी उबडतो
सोनेरी रंगांचे घडे
आकाशाच्या फळ्यावर
किमया न्यारी घडे




• **रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि. यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## पाणी

पाणी पाणी पाणी गेलं सरुनिया पाणी
पाण्याविना अधुरीच आयुष्याची गाणी

जरी भरलं धरण किती पुरल पुरल
माठातील पाणी आता सरलं सरलं
नाही नळाला रे पाणी ही रोजची गाऱ्हाणी
पाणी पाणी पाणी गेलं सरुनिया पाणी

भर उन्हात रे देवा नद्या विहिरी आटल्या
थेंब थेंब पाण्यासाठी बायाबापड्या धावल्या
या कोरड्या रानाची कशी कोरडी कहाणी
पाणी पाणी पाणी गेलं सरुनिया पाणी

माय मातीच्या कुशीत थेंब थेंब हा जिरावा
पाण्यासारखा निर्मळ जन्म माणसाचा व्हावा
जरा वापरा जपून अरे पाणी आणि वाणी
पाणी पाणी पाणी गेलं सरुनिया पाणी




कवी ज्ञानेश्वर गायके
कन्नड



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
**साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स**
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**
■ प्रोजेक्ट रिपोर्ट ■ डेझर्टेशन
■ पीएच.डी./एम.फिल.थेसिस ■ कलर प्रिंट
■ डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट ■ स्कॅनिंग
■ स्पायरल व हार्ड बायडींग ■ लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



**प्रतिनिधी नेमणे आहे**
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.